# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपुर शहर परिमंडळ, नागपुर.

---

## प्रकरण क्रं. ग्रागानिमं/नाशप/०५९ /२०१०

अर्जदार : श्री अब्दुल कलाम अब्दुल सलाम,
राहणार सैफी नगर,
मोमीनपुरा,
नागपुर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
गांधीबाग विभाग,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित,
नागपुर.

गणपुर्ती : 1) श्रीमती के.के घरत,
सदस्य–सचिव

2) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या

–– आदेश ––

पारीत दि. ०२.०९.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यांनी तक्रार अर्ज दिनांक २९.०७.२०१० रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम २००६ कलम ६.४ प्रमाणे दाखल केलेला आहे.

<u>अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील</u> :–

१. अर्जदार, अब्दुल कलाम अब्दुल सलाम, रा. मोमीनपुरा, नागपुर, यांनी कार्यकारी अभियंता, गांधीबाग विभाग, म.रा.वि.वि.कं. मर्यादित, गैरअर्जदार, यांच्या अंतर्गत असलेल्या शाखा कार्यालयात नवीन विद्युत जोडणी करिता अर्ज सादर केला होता. परंतु सदर जागेवर जुनी थकबाकी असल्यामुळे गैअर्जदाराने थकबाकी भरल्याशिवाय विज जोडणी देता येणार नाही असे अर्जदारास कळविले. त्यामुळे अर्जदारांनी दिनांक २७.०४.२०१० रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सवसु मंडळ, नागपुर शहर प्रविभाग, मराविविकं मर्यादित, नागपुर, येथे आपला तक्रार अर्ज दाखल केला होता. त्यावर नागपुर शहर प्रविभागा तर्फे दिनांक १४.०७.२०१० च्या पत्राव्दारे त्यांना कळविण्यात आले की थकबाकी भरल्याशिवाय नवीन विज जोडणी देता येत नाही, तेव्हा थकीत विज जोडणी करीता थकीत रक्कम भरणे आवश्यक आहे. अर्जदाराला सदर उत्तर मान्य नसल्याने त्याने दिनांक १९.०७.२०१० रोजी मंचात गा–हाणे दाखल केले व विनंती केली की ––

अ) अर्जदाराची आर्थिक स्थिती बरोबर नसल्याने तो थकबाकी भरू शकत नाही. कारण त्याने विजेचा वापर न केल्याने जुनी थकबाकी त्याला मंजुर नाही व थकबाकी माफ करून त्याला नवीन विज जोडणी देण्यात यावी.

२. अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या पत्रात असे नमुद केले आहे की, दि.१२.०४.२०१० रोजी त्यांना गैरअर्जदारातर्फे तर्फे असे कळविण्यात आले की त्यांच्या जागेवर रू. ५३,८४८.०९/– इतकी थकबाकी आहे. सदर थकबाकीशी त्यांचा काहीही संबंध नाही, म्हणुन त्यांनी मंचाला विनंती केली की त्यांची आर्थिक

स्थिती नाजुक असल्याने, ते थकबाकी भरू शकत नाही. तसेच ज्या लोकांनी विजेचा वापर केलेला होता ते तिथे सध्या राहत नाही. त्यामुळे थकबाकी न घेता, त्या ठिकाणी नवीन विज जोडणी देण्यात यावी व थकबाकी रद्द करण्यात यावी.

३. दिनांक १३.०८.२०१० गैरअर्जदाराने आपले उत्तर दाखल केले आहे. त्यामंध्ये असे नमुद केले आहे की अर्जदाराने ज्या जागेवर नवीन विज पुरवठा करीता अर्ज सादर केलेला आहे, त्या जागेवर श्री अब्दुल कलाम अ. सलाम या नांवाने विज जोडणी होती व ती कायमस्वरूपी खंडीत करण्यात आली होती. त्या जागेवर रू. ५३,८४८.०९/- इतकी आहे. तेव्हा जर अर्जदार थकबाकी भरण्यास तयार असेल तर परिपत्रक क्रं. ९८ प्रमाणे ५०% व्याजाची रक्कम माफ करण्यात येईल व उर्वरीत रक्कम रू. ४५,१२७.०९ भरल्यानंतर नवीन विज जोडणी देता येईल. याची माहिती ग्राहकास दिली आहे, परंतु ग्राहकाने कुठलाही प्रतिसाद दिला नाही.

४. दिनांक १६.०८.२०१० रोजी मंचात सुनावणी घेण्यात आली. अर्जदार अनुपस्थित होते. गैरअर्जदारातर्फे श्री गुप्ता, उपकार्यकारी अभियंता, गांधीबाग विभाग व श्री कन्हेरे, उपकार्यकारी अभियंता, इतवारी उपविभाग हे उपस्थित होते. गैरअर्जदाराने सांगितले की हे प्रकरण, प्रकरण क्रं. ५८ नावे मुर्तुजा ऐनुल हक प्रमाणे आहे. त्यावेळेस श्री मुर्तुजा हक सुध्दा उपस्थित होते. त्यांनी सुध्दा मान्य केले कि दोन्ही प्रकरण एक सारखे आहेत.

५. मंचात दाखल केलेल्या कागदपत्रावरून तसेच गैरअर्जदार व श्री मुर्तुजा हक यांच्या वक्तव्यावरून असे स्पष्ट होते की ज्या जागेवर नवीन विज जोडणीची मागणी करीत आहे, त्या जागेवर अर्जदाराच्या संबंधीताची विज जोडणी होती. तेव्हा थकबाकीशी त्यांचा कुठलाही संबंध नाही हे वक्तव्य मान्य करता येत नाही.

तसेच आर्थिक परिस्थिती वगळता अर्जदार मंचाला स्पष्ट करू शकले नाही की, थकबाकीशी त्यांचा कुठलाही संबंध नाही. जरी विजेचा वापर अर्जदाराने केला नाही, परंतु सदर जागा वारसाहक्काने अर्जदाराला मिळाली असल्याने, अर्जदार सदर जागेवर असलेली थकबाकी नाकारू शकत नाही, तेव्हा अर्जदाराची थकबाकी माफ करण्याची विनंती मंचाला मान्य नाही.

६. गैरअर्जदारातर्फे नवीन विज जोडणी करीता अर्जदाराला एकुण थकबाकी रू. ५३,८४८.०९/– मधुन ५०% व्याज माफ करून रू. ४५,१२७.०९ अशी रक्कम असलेले विद्युत देयक देण्यात आले आहे. तेव्हा मंचाचे असे मत आहे की अर्जदार त्या जागेचा वारसदार आहे तेव्हा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) निनियम, २००५ कलम १०. ५ नुसार जर मृत ग्राहक किंवा जागेचा पूर्वीचा मालक / वहिवाटदार, जसे असेल तसे, यांनी विजेचा आकार किंवा विजेच्या आकाराशिवाय अन्य कोणतीही वितरण परवानेधारकास देय असलेली रक्कम अदा करणे बाकी राहिल असेल तर तो बोजा, जागा ज्या कायदेशीर प्रतिनिधी/कायदेशीर वारस किंवा जागेचा नवीन मालक/वहिवाटदार यांच्या नावे हस्तांतरीत झाली असेल, जसे असेल तसे यांच्यावर राहील आणि अशा कायदेशीर प्रतिनीधी /कायदेशीर वारस किंवा जागेचा नवीन मालक / वहिवाटदार यांच्याकडुन वितरण परवानाधारक वसूल करेल.

त्यामुळे अर्जदाराला सदर थकबाकी भरणे बंधनकारक आहे,

## आदेश

अर्जदाराची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

सही/–
(श्रीमती के.के. घरत)
सदस्य–सचिव

सही/–
(श्रीमती गौरी चांद्रायण)
सदस्या